दै. लोकसत्ता, चतुरंग

SHARE

# ‘लक्ष्य’वेधी!

डॉ. विनय सहस्रबुद्धे - शनिवार, ३१ जुलै २०१०
vinays57gmail.com



इजिप्त तसेच आफ्रिकन देशांमध्ये आता ‘महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानता’ खात्यासाठी स्वतंत्र मंत्री आहेत. अरब राष्ट्रांत शरीरविक्रयासाठी महिलांची मानवी-वाहतूक थांबविण्यासाठी ठोस प्रयत्न सुरू आहेत. नायजेरिया, घाना, मालावी, द गांबिया या देशांनी शालेय शिक्षणात मुलींचे प्रमाण वाढवले आहे. लिबेरियाने शेतीतील महिलांचा सहभाग विलक्षण वाढविला आहे.. ‘मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स’च्या ‘लक्ष्य’प्राप्तीचा आढावा-

नव्या सहस्रकाचं पहिलं दशक आणखी काही महिन्यांनी संपेल. दहा वर्षांपूर्वी नवं सहस्रक सुरू झालं तेव्हा संयुक्त राष्ट्र संघाने संपूर्ण जगासमोर असलेल्या विकास-प्रश्नांचा मागोवा घेऊन ‘सहस्राब्दी विकास लक्ष्ये’ म्हणजेच ‘मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स’ निश्चित केली. गरिबी आणि भुकेकंगाली संपविणे, शिक्षणाचे सार्वत्रिकरण, महिलांचे सबलीकरण आणि लिंग-भेदभावाची समाप्ती, नवजात बालकांचे आरोग्य, मातृ-आरोग्य आणि रोगांचा नायनाट, पर्यावरणानुकूल विकास आणि विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य अशी ही एकूण आठ सहस्राब्दी विकास-लक्ष्ये आहेत.

नव्या सहस्रकाची सुरुवात होत असताना ‘युनो’ने वंचितांच्या विकासाची एक वैश्विक कार्यक्रम पत्रिका जगासमोर मांडली आणि त्यातूनच ही विकास-लक्ष्ये निश्चित केली गेली. उल्लेखनीय बाब म्हणजे ही विकास-लक्ष्ये जरी नव्या सहस्रकाच्या निमित्ताने असली तरी पहिल्या १५ वर्षांत, म्हणजे २०१५ पर्यंत लक्ष्यप्राप्तीच्या कुठल्या टप्प्यापर्यंत पोहोचायचे, त्याचा एक कार्यक्रमही संयुक्त राष्ट्र संघाने तयार केला आहे.

‘युनो’च्या अनुषंगिक संस्थांमध्ये आर्थिक- सामाजिक परिषद किंवा ‘इकॉनॉमिक अ‍ॅण्ड सोशल कौन्सिल’ ही एक महत्त्वाची संस्था आहे. ‘इकोसोक’ हे तिचे लघुरूप. या संस्थेने अलीकडेच एक विशेष अधिवेशन आयोजित केले होते. त्यात ‘महिला सबलीकरण आणि लिंग समानते’च्या संदर्भातील विकास-लक्ष्याचा आढावा घेतला. मलेशियाचे ‘युनो’तील कायम प्रतिनिधी हमीदान अली हे ‘इकोसोक’चे सध्याचे अध्यक्ष आहेत. त्यांच्याच अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या विशेष अधिवेशनात विविध देशांनी महिला सबलीकरणाचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने जे प्रयत्न केले, त्यांचा आढावा घेतला गेला. त्या त्या देशांच्या संबंधित मंत्र्यांनी वा प्रतिनिधींनी केलेली निवेदने, त्या निवेदनांची संक्षिप्त समीक्षा व त्यावर चर्चा- असे या परिषदेचे स्वरूप होते. २८ जून ते २ जुलै दरम्यान न्यूयॉर्कला ‘युनो’च्या मुख्यालयात पार पडलेल्या या परिषदेसाठी संयुक्त राष्ट्र संघाने

सल्लागार संस्थेचा विशेष दर्जा दिलेल्या काही स्वयंसेवी संस्थामनाही निमंत्रित करण्यात आले होते. महिला सबलीकरणासंदर्भात पुरुष प्रबोधनाची आणि पुरुषांच्या पारंपरिक मानसिकतेतील बदलांसाठी प्रशिक्षणाची गरज प्रतिपादित करणारे एक निवेदन ‘रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी’ने तयार केले होते. त्या निवेदनाची मांडणी करण्यासाठी ‘युनो’च्या सल्लागार संस्थेचा दर्जा संपादन केल्याने प्रबोधिनीलाही या परिषदेत सहभागाची संधी मिळाली. त्यामुळेच मला या आंतरराष्ट्रीय परिषदेचा साक्षीदार बनता आले.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील असली तरी ‘युनो’ही बोलून-चालून विविध सरकारांनी बनविलेली संस्था. त्यामुळेच टिपिकल सरकारी औपचारिकतांचा बडेजाव अंमळ अधिकच! ३००-४०० सरकारी प्रतिनिधींच्या या परिषदेत जगभरातल्या ४४ स्वयंसेवी संस्थांना निमंत्रित केले होते. त्यात चार संस्था भारतातून अपेक्षित होत्या, पण प्रत्यक्ष प्रतिनिधी पाठविणारी एकमेव रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच तेवढी होती.

नेदरलॅण्ड, झिम्बाब्वे, फ्रान्स, इजिप्त, सेनेगल, भारत, पोर्तुगाल, कोरिया आणि अमेरिका अशा अनेक देशांच्या मंत्र्यांनी महिला सबलीकरणासंदर्भात आपण योजलेल्या धोरणात्मक आणि कार्यक्रमात्मक उपायांची माहिती या परिषदेत सांगितली. भारताच्या परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री प्रनित कौर शेवटच्या टप्प्यात उपस्थित होत्या. उल्लेखनीय बाब म्हणजे भारतापेक्षाही मागासलेल्या अशा अनेक देशांनी आपापल्या सरकारात ‘लिंगभाव समानता’ या विषयासाठी स्वतंत्र खाती निर्माण केली आहेत. भारताची धाव अजूनही महिला कल्याणाच्या पलीकडे गेलेली नाही. इजिप्तमध्ये ‘परिवार आणि लोकसंख्या व्यवहार’ या नावाने स्वतंत्र विभाग आहे, तर अनेक आफ्रिकन देशांमध्येसुद्धा आज ‘महिला सबलीकरण आणि लिंगभाव समानता’ खात्यासाठी स्वतंत्र मंत्री वा राज्यमंत्री आहेत.

या परिषदेत जी निवेदने झाली त्यातून कितीतरी महत्त्वाचे मुद्दे समोर आले. इजिप्तमध्ये राष्ट्राध्यक्षांच्या पत्नीच्या पुढाकारातून देशाच्या संसदेतील ६४ जागा (एकूण जागा ५१८) महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सर्व अरब राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांच्या भार्यांनी एकत्र येऊन अरबी महिलांची वैश्विक संघटना स्थापन केली असून, शरीरविक्रयासाठी महिलांची मानवी-वाहतूक थांबविण्यावर त्यांचा विशेष भर आहे. महत्त्वाचे म्हणजे काही मुस्लीम देशांमधून आजही महिलांची (सुद्धा) ‘सुंता’ करण्याची जी अघोरी प्रथा आहे, ती मोडून काढण्यासाठी २००९ मध्ये इजिप्त सरकारने कायदेशीर तरतूद केली आहे.

सुदानसारख्या कट्टरवादी मागास देशानेही महिलांची ‘सुंता’ करण्याच्या प्रथचा धर्माशी कोणताही संबंध नसल्याबाबत व्यापक जनजागरण घडवून आणली आहे. त्यांनी खुद्द मुल्ला-मौनवींच्याच सहभागाने ही प्रथा बंद करण्याबाबत प्रयत्न चालविले आहेत. त्यांनी याच उद्देशाने इमामांसाठी योजलेले प्रशिक्षण वर्ग यशस्वी झाल्याचेही सांगण्यात आले.

नेदरलॅण्ड सरकारने संघर्ष क्षेत्रात जाणाऱ्या शांतीरक्षक सेनांच्या जवानांचे प्रशिक्षण घडवून आणून त्यांच्याकडून होणाऱ्या महिलांवरील अत्याचारांना पायबंद घालण्याबाबत काही चांगले प्रयोग केले आहेत. शिवाय जाहिरातीतून होणारे स्त्री-देहाचे व्यापारीकरण व लैंगिकीकरण रोखण्यासाठीही काही उपाय योजण्याचा इरादा बोलून दाखविला आहे. भारतात शाळांमधून लैंगिक शिक्षण देण्याच्या

विषयाची बरीच उलट-सुलट चर्चा झाली आहे. नेदरलँड सरकारने पालकांनीच पाल्यांना हे शिक्षण द्यायला हवे, अशी धोरणात्मक शिफारस केली आहे.
लेसोथो या अति-मागास देशात आजही सर्रास बालविवाह होतात. लेसोथो सरकारने विवाहितांची कायदेशीर जबाबदारी व अधिकार यासाठी एक स्वतंत्र कायदा केला आहे. त्यामुळे सज्ञान नसलेल्या विवाहितेलाही कायदेशीर संरक्षण मिळाले आहे.
घाना आणि मालावी या देशांनी शाळांमधील मुलींच्या स्वच्छतागृहांची अवस्था कितीतरी पटींनी सुधारली गेली. त्याचा परिणाम म्हणून शाळांमध्ये दाखल होणाऱ्या मुलींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली.
या परिषदेच्या निमित्ताने यु.एन.डी.जी. (युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट ग्रुप) या अनुषंगिक संस्थेने सहस्राब्दी विकास लक्ष्यांच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांबाबतच्या ‘उल्लेखनीय उपक्रमांची’ तोंडओळख करून देणारे एक प्रकाशन केले असून ते खरोखरच अभ्यसनीय आहे. या प्रकाशनात इतर अनेक विषयांबरोबरच महिलांमधील उद्योजकता विकासासंदर्भातील सफल उपक्रमांचीही विशेष नोंद घेण्यात आली आहे.
लिबेरिया हा पश्चिम आफ्रिकेतला छोटासा देश. या देशाने आर्थिक, विशेषतः कृषी उत्पादनाच्या क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा म्हणून विशेष प्रयत्न केले आहेत. कस्सावा हे लिबेरियातल्या मुख्य खाद्यानाचे पीक! कस्सावाच्या शेतीसाठी व मुख्य म्हणजे कस्सावाच्या उत्पादनावर खाद्यान्न प्रक्रिया करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण देऊन सक्षम करण्याचे लिबेरियातले प्रयोग इतके कमालीचे यशस्वी झाले की, आज कस्सावाची शेती, उत्पादन प्रक्रिया आणि विक्री या सर्व क्षेत्रात सर्वत्र महिलांचा दबदबा निर्माण झाल्याचे चित्र आहे.
याच प्रकारे चीन, इंडोनेशिया आणि पाकिस्तानातही शेतकरी महिलांच्या सबलीकरणासाठी प्रशिक्षण आणि प्रबोधनाची व्यापक मोहीम राबविली जात आहे. महिला शेतकऱ्यांना ‘गांभीर्याने’ घेण्याची पद्धत या तिन्ही देशात पूर्वी नव्हती, ती आता हळूहळू रुजू घातली आहे.
भारतातही आज ग्रामीण सामाजिक जीवन तगून आहे, ते मुख्यत्वे ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्रियतेवर. जवळपास सर्वच विकसनशील देशांत ही स्थिती आहे. पण ग्रामीण महिलांच्या या योगदानाची फारशी दखल कुठेच आणि कधीच घेतली जात नाही. चीन, इंडोनेशिया आणि पाकिस्तानमधील प्रयत्नांतून हे वास्तव बदलते आहे, ही बाब आश्वासक म्हणायला हवी.
किरगिझिस्तानात वंचित वर्गातील महिलांच्या उद्योजकता विकासासाठी जे प्रयत्न केले गेले, त्यात विधवा, अपंग, अविवाहित माता यांचा प्राधान्याने समावेश केला गेला. अशिक्षित महिलांनीही व्यावहारिक ज्ञानाच्या बळावर उद्योगक्षेत्रात जोरदार आघाडी घेतली. जी कुटुंबे अन्यथा उघड्यावर पडली असती, ती यामुळे वाचली.
चीनमध्ये महिला उद्योजकांच्या विकासासाठी ‘बिझिनेस इनक्युबेटर’ ही संकल्पना राबविली जात आहे. विशेषतः महिला कामगार व कर्मचारी असलेल्या महिला-संचालित उद्योगांनी तिचा चांगला फायदा घेतला आहे.
द गांबिया हा पश्चिम आफ्रिकेतलाच देश! या देशाने शालेय शिक्षणात मुली दाखल होण्याचे प्रमाण वाढावे आणि मुख्य म्हणजे मुलींची गळती थांबावी यासाठी ‘गर्ल-फ्रेंडली’ शाळा उघडल्या आहेत. शाळेतून ‘ड्रॉप’ घेतलेल्या मुलींना पुन:प्रवेशासाठी प्रोत्साहन, विद्यार्थी-केंद्रीत अभ्यासक्रम आणि

शालेय प्रशासनात विद्यार्थी-विद्यार्थिनींचा व्यापक सहभाग, 'सुरक्षितता' वाटेल असे शालेय वातावरण आणि कुमारी माता झालेल्यांनाही वर्गात बसणे सोपे जावे यासाठी खास सोयीस्कर स्कूल बेंचेसची रचना- अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे या 'गर्ल फ्रेंडली' शाळा लोकप्रिय झाल्या आहेत.

नायजेरियात शालेय शिक्षणात मुली दाखल होण्याचे प्रमाणही निव्वळ व्यापक जनजागरण मोहिमांमुळे वाढले आहे. २००६ मध्ये चार मुलांमागे एक मुलगी शाळेत दाखल होई. आता दोन मुलांमागे एक मुलगी- असे प्रमाण आहे.

भारतात संसदेत महिला आरक्षणाचे विधेयक अजूनही प्रलंबितच आहे. या पाश्र्वभूमीवर कांबोडिया या छोटय़ा देशाने निर्णय-प्रक्रियेतील महिला सहभागाच्या संदर्भात व्यापक जनजागरण घडवून चांगले यश मिळविलेले दिसते. २००२ मध्ये झालेल्या तिथल्या निवडणुकीत महिला उमेदवारांचे प्रमाण १६% होते, ते २००७ मध्ये २१% पर्यंत वाढले आहे. विजयी महिला उमेदवारांचे प्रमाण तर लक्षणीयरित्या, म्हणजे ८.५ वरून १५ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. कांबोडियात नागरी सेवांमध्ये महिलांसाठी अलीकडेच विविध टप्प्यांवर २० ते ५०% आरक्षण ठेवण्यात आले आहे. पण आरक्षण नसलेल्या जागांवरही गेल्या एका वर्षांत महिलांच्या नियुक्तीचे प्रमाण ३२ वरून ३४ टक्क्यांवर गेले आहे.

कुवेतमध्येही महिला संसद सदस्यांसाठी विशेष प्रशिक्षण योजना राबविली जात आहे, तर बोस्निया-हरझेगोविना या देशांनी 'जेंडर बजेटिंग'ची संकल्पना स्वीकारून अनेक नवे महिला-केंद्रित उपक्रम सुरू केले आहेत.

युगांडा या आफ्रिकन राष्ट्रनेही 'जेंडर पॉलिसी आणि कृती योजना' आखली असून, निर्णय घेणाऱ्या पदांवर ३०% तरी महिला असाव्यात, यासाठी नवे धोरण आखले आहे.

यु.एन.डी.जी.च्या या प्रकाशनात कांबोडियात स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी महिला-कार्य मंत्रालयाने केलेल्या प्रयत्नांची दखल घेतलेली आहे. अनेक गरीब व मागास दक्षिण आशियाई देशांप्रमाणेच कांबोडियातील महिला देहव्यापारासाठी होणाऱ्या मानवी वाहतुकीच्या बळी ठरत आल्या आहेत. समाजातील दारिद्रय़, अज्ञान, अत्याचार, असंवेदनशीलता आणि अनास्था यामुळे सुरू राहिलेली महिलांची उपेक्षा निदान आता सरकारी पातळीवर संपू लागण्याची चिन्हे आहेत. हे कशामुळे घडू शकले? याचे विश्लेषण करताना या प्रकाशनात म्हटले आहे की, या 'महिला सबलीकरणाबद्दलच्या योजनेविषयी ती राबविणाऱ्या नोकरशाहीने व मंत्र्यांनीही दाखविलेली 'आत्मियता' आणि मंत्रालयातल्या महिलांची नेतृत्वक्षमता व इच्छाशक्ती यांना' या यशाचे श्रेय जाते.

एकूण काय, तर महिला सबलीकरणाच्या विस्तारलेल्या विश्वाचा केंद्रबिंदू आहे तो 'मानसिकता' हाच.. मानसिकता- महिलांची, पुरुषांची आणिसंपूर्ण समाजाची!